**MHAH180016642022**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.४५९/२०२२ मधील</u>**
**<u>आदेश नि.क.२१</u>**

*नंदराज दत्तात्रय पावसे* ... *वादी*
*विरूध्द*
*गोकुळ दत्तात्रय पावसे* ... *प्रतिवादी*

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात आवश्यक प्रतिवादी म्हणुन सामिल करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरूध्द नितंतर ताकीद मनाई हुकूमाकरीता व जाहिर ठरावासाठी दाखल केला आहे. सदरचे दाव्यातील प्रतिवादी यांनी दि. २७/०७/२०२२ रोजी दावा मिळकतीचे वादीचे परवानगीशिवाय बेकायदेशीररित्या खरेदीखत श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांना कायम खरेदी खतान्वये दुय्यम निबंधक, राहुरी यांचे समोर करून दिले आहे. प्रतिवादी व श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांचेमध्ये झालेला व्यवहार हा बोगस बिनकब्जाचा व बेकायदेशीर असुन तो वादीवर बंधनकारक नाही. म्हणुन दाव्यातील मिळकत खरेदी घेणार यांना प्रतिवादी म्हणुन सामिल करणे आवश्यक आहे. म्हणुन श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांना आवश्यक प्रतिवादी म्हणुन दाव्यात सामिल करण्याची विनंती वादी यांनी केली आहे. म्हणुन, वादीने प्रस्तुत अर्जात कथन केल्याप्रमाणे आवश्यक पक्षकार म्हणुन त्यांना दाव्यात सामिल करणे न्यायाचे कामी व वादीचे हिताचे दृष्टीने गरजेचे आहे. त्या अनुषंगाने वादीने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्यात

न्यायनिवाडा करण्यास कोणतीही कायदेशीर अडचण येणार नाही. सबब वादीने दावा दुरूस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

३) प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. २३ अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादी यांचा सदरचा अर्ज हा खरा नाही, कायदेशीर नाही. वादी यांचे अर्जास कोणतेही योग्य, रास्त व संयुक्तीक असे कारण घडलेले नाही, वादी यांनी सदरचे अर्जात फक्त रामेश्वर बापुसाहेब कदम यांना सामिल करण्यात यावे असा मोघम स्वरूपाचा अर्ज दिलेला आहे, त्याप्रमाणे वादी यांनी दाव्यात दुरूस्ती करून मागण्याचा कोणताही अधिकार नाही, वादी यांनी मुळ दावा हा मनाई हुकूमाचा दाखल केलेला होता. प्रतिवादी यांनी सदरील वादातील मिळकतीची विक्री केलेली आहे. सबब, वादी यांचे दाव्याचे कारण संपुष्टात आलेले आहे. सबब वादी यांना अशा प्रकारे अर्ज देवुन दावा दुरूस्त करून मागण्याचा कायदयाने कोणताही अधिकार नाही. सबब, प्रतिवादी यांनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासहित रद्द करण्याची विनंती केली आहे.

४) वादी व प्रतिवादीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला.

५) अर्ज व म्हणण्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रस्तावित दुरूस्ती ही औपचारिक स्वरूपाची आहे. प्रस्तुत प्रकरणात मुद्दे अजून गठीत झालेले नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषावर चालविण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. त्यामुळे, वर नमुद केलेल्या कारणामुळे दाव्याचे स्वरूप पाहता प्रस्तावित दुरूस्ती गरजेची वाटते.

६) वर नमुद केलेली कारणमिमांसा विचारात घेता, सदरचे

विशोधन दाव्याचे अंतिम निर्णयासाठी इष्ट व आवश्यक आहे. तसेच, दावा सुरू झाल्यानंतर झालेल्या बदलामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला दिसुन येतो. सबब, दाव्याला आवश्यक पक्षकाराची बाधा राहु नये, म्हणुन, न्यायाचे हेतुस्तव पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) वादी यांनी आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाचे आत दुरूस्ती करावी व श्री. रामेश्वर बापुसाहेब कदम यांना दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामिल करण्यास परवानगी देण्यात येत आहे. त्याच कालावधीत दाव्याची विशोधित प्रत अभिलेखावर दाखल करावी.

**राहुरी**
**दिनांक :- ०२.०९.२०२३**

**(सौ. आर. एस. तापडीया)**
**सह दिवाणी न्यायाधीश,**
**क.स्तर, राहुरी**